# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{महसूल विभाग}**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये शहरातील प्रत्येक जमिनी व इमारतीवर कर योग्य मूल्य आधारीत पध्दतीने मालमत्ता कर आकारण्याचे काम निरंतर चालू असते. आर्थिक वर्ष 2022-2023 मध्ये एकूण 671440 मालमत्तांचा सर्वे करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमची अनुसूची "ध" प्रकरण VIII चे कराधान नियम 39 च्या तरतूदी अन्वये "मालमत्ता कर वसूल करणेसाठी तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल. असे या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जाहीर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हप्ता देय होईल तेव्हा, मा. आयुक्ताने फारसा विलंब न लावता, उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तीने देय असलेल्या रक्कमेचे बिल देण्याची व्यवस्था केली पाहीजे."

आर्थिक वर्ष 2022-2023 करीता सामान्य प्रशासन विभाग म.न.पा. चे दर करार क्र. साप्रवि/409/एम दिनांक 01/10/2021 अन्वये Jobwork करीता 2.25/- प्रति पान दर निश्चित आहे. सदर मंजूर दर प्रमाणे एकूण 14.50 लक्ष मागणी दयेक छपाई करण्याकरिता लागणारा एकूण रु. 32,62,500/- खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 344/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 11/04/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, महसूल विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये शहरातील प्रत्येक जमिनी व इमारतीवर कर योग्य मूल्य आधारीत पध्दतीने मालमत्ता कर आकारण्याचे काम निरंतर चालू असते. आर्थिक वर्ष 2022-2023 मध्ये एकूण 671440 मालमत्तांचा सर्वे करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमची अनुसूची "ध" प्रकरण VIII चे कराधान नियम 39 च्या तरतूदी अन्वये "मालमत्ता कर वसूल करणेसाठी तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल. असे या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जाहीर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हप्ता देय होईल तेव्हा, मा. आयुक्ताने फारसा विलंब न लावता, उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तिने देय असलेल्या रक्कमेचे बिल देण्याची व्यवस्था केली पाहीजे."

आर्थिक वर्ष 2022-2023 करीता सामान्य प्रशासन विभाग म.न.पा. चे दर करार क्र. साप्रवि/409/एम दिनांक 01/10/2021 अन्वये Jobwork करीता 2.25/- प्रति पान दर निश्चित आहे. सदर मंजूर दर प्रमाणे एकूण 14.50 लक्ष मागणी दयेक छपाई करण्याकरिता लागणारा एकूण रु. 32,62,500/- खर्चास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**